Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# कृषीक्षेत्रातील महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

**उषा शरद इंगळे,** पीएच.डी. संशोधिका, अर्थशास्त्रं विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, (छत्रपती संभाजीनगर)

## प्रस्तावना

शेतीचा शोध महिलांनी लावला आहे. प्राचीन काळापासून मानवी इतिहासात महिलांचा कृषी क्षेत्रात सहभाग आढळून येतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे असून, शेतीव्यवसायात महिला मोठ्या संख्येने आहेत. हा व्यवसाय योग्य पद्धतीने त्या करताना दिसून येतात. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. हे असंघटित क्षेत्र म्हणून ओळखले जाते. ग्रामीण भागातील लोकांच्या उदरनिर्वाहाचे शेती हे प्रमुख साधन असून, अधिकाधिक लोक शेती व्यवसाय करतात. जास्तीत जास्त महिला शेतकरी किंवा शेतमजूर म्हणून काम करतात. 80% महिला शेती व्यवसायात आहेत.

पारंपरिक समाजव्यवस्थेत स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे दिसून येते की, पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचे विविध पातळयावर शोषण केले आहे. परंपरेने तिला अबला हे विशेषण लावले आहे. "चूल आणि मूल" हेच तिचे आयुष्यभराचे कार्यक्षेत्र तिच्याकडे पहात असताना तिला नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाते. पुरुषाशिवाय तिला पूर्णत्व येऊ शकत नाही, हे तिच्या मनावर वारंवार बिंबविले जाते. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्या ग्रंथांचे लेखनही पुरुषांनी त्यांच्या सोयीप्रमाणे केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीला सहनशील, सोशिक, ममतेचा सागर अशा रीतीने स्त्रीला दर्शविले गेले. पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वत:चा आवाज व स्वातंत्र्य हिरावून बसली. महिलांना धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक बाबतीत दुय्यम दर्जा दिला जातो. कृषी क्षेत्रातही महिलांना समान वागणूक दिली जात नाही.

## महिलांची आर्थिक स्थिती

आज आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात निम्मी लोकसंख्या महिलांची असून सुद्धा त्या आपल्या मूलभूत अधिकारापासून वंचित आहेत. विशेष करून ग्रामीण भागात आपल्याला तसे चित्र दिसून येते. पुरुषांच्या प्रत्येक क्षेत्रात महिला उत्तुंग भरारी घेत आहेत. मग, ते कोणतेही क्षेत्र असो, स्त्रियांचे कर्तृत्त्व वाखणण्याजोगे आहे. परंतु, कृषी हे असे क्षेत्र आहे की, यामध्ये महिला पुरुषांपेक्षा जास्त काम करतात, तरीसुद्धा त्यांना कृषीमध्ये दुय्यम स्थान आहे.[1] व्यवहारात किंवा बाजारात शेतक-यांची ओळख त्यांच्या नावे शेती आहे की नाही यावर अवलंबून आहे. यामध्ये कोण? किती? काम करतो ते महत्त्वाचे नाही. महिला पुरुषांपेक्षा जास्त काम करतात, परंतु शेती पुरुषांच्या नावे असल्याने त्यांना कोणी ओळखत नाही. शेतीमालकाच्या नावे ओळख असते. भारतीय कृषी व्यवहारात महिलांची कमी प्रमाणात शेतजमीन असते. कृषी जनगणना 2010 ते 2011 च्या अहवालानुसार भारतात सध्या स्थितीमध्ये 12.78% महिलांच्या नावे शेतजमीन असून, कृषीमध्ये निणर्य भूमिका महिलांची नसून, यातील प्रमुख कारण म्हणजे शेतजमीन महिलांच्या नावे असण्याचे प्रमाण नगण्यं आहे.[2] 12.78% महिलांच्या नावे शेतजमीन आहे व 87.22% शेतजमीन पुरुषांच्या नावे आहे. पुरुषांच्या तुलनेत महिला शेतकऱ्यांचे प्रमाण कमी दिसून येते. खूप कमी महिलांचा आर्थिक व्यवहारात सहभाग आढळून येतो. मात्र शेतीत काम करणाऱ्या महिलांची संख्या पुरुषांच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

तूलनेत जास्त दिसून येते. शेतीतील सर्व प्रकारची कामे त्या करतात. घरचे काम करून त्या शेतातही ही काम करत असतात. जसे की, बी-पेरणी करणे, मळणी करणे, खुरपणे, कापूस वेचणे अशा प्रकारची विविध कामे त्या करतात. त्याच सोबत शेतीला जोडव्यवसाय ही त्या करताना आढळून येतात. जसे की, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय ही कामे त्या उत्तमरीत्या करतात. त्या पतीच्या प्रत्येक कामात त्यांचा हातभार असतो. तरी त्यांच्या नावे वार्षिक उत्पन्न राहत नाही. खूप कमी महिलांच्या नावे वार्षिक उत्पन्न असते. वार्षिक उत्पन्नासाठी महिला रात्रं-दिवस काम करतात. परंतु, त्यांचे उत्पन्न पतीच्या किंवा कुटुंबप्रमुखांच्या नावे जमा होते. यामुळे आर्थिक व्यवहारात महिलांचा वाटा नगण्य आहे.

कृषी क्षेत्रात गुंतलेल्या अंदाजे 52-75 टक्के भारतीय स्त्रिया निरक्षर आहेत. हा शिक्षणाचा अडथळा आहे, जो महिलांना अधिक कुशल कामगार क्षेत्रात सहभागी होण्यापासून प्रतिबंधित करतो. महिलांना सामान्यत: त्यांच्या स्वत:च्या कुटुंबाबाहेर निर्माण होणाऱ्या शेतीविषयक माहितीपर्यंत पोहोचणे हे आवघड होते. हे प्रामुख्याने साक्षरतेच्या कमी दर आणि गतिशिलतेच्या अभावामुळे होते.[3] केंद्र व राज्यसरकारच्या कृषिविषयक अनेक योजना आहेत. विविध योजना शासन राबवित आहे. परंतु, निरक्षर किंवा कमी शिकलेल्या महिलांपर्यंत या योजना पोहोचत नाहीत. या योजनांचा उद्देश शेतक-यांचे जीवनमान सुधारणे आणि त्यांच्या आर्थिक बाजू उंचावणे हा असतो. मात्र, निरक्षर महिला या लाभापासून वंचित राहतात. योजनांच्या लाभासाठी ज्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते, त्या कागदपत्रांची पूर्तता करणे त्यांना जमत नाही. यामुळे या महिला सरकारी लाभापासून वंचित राहतात. त्यांना कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नाही. सरकारकडून शेतीसाठी जे कर्ज दिले जाते अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन या कर्ज योजनांचा महिलांना लाभ घेता येत नाही. परंतु, सावकार, नातेवाईक व इतर खाजगी क्षेत्रातून कुठल्याही कागदपत्रांची पूर्तता न करता सहज कर्ज मिळते, परंतु त्याचा व्याज दर अधिक असतो. तरीही सहज साध्य कर्ज मिळते यामुळे महिला प्रामुख्याने सावकार, नातेवाईक व इतर खाजगी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतात. शेती ही प्रामुख्याने पावसावर अवलंबून असते. कधी खूप पाऊस पडतो, तर कधी कमी पाऊस पडतो. त्यामुळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळास शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. अधिक पावसामुळे हाती आलेले पीक वाया जाते, कधी-कधी कमी पावसामुळे पीक येतच नाही आणि एकीकडे कर्जाचा बोजा वाढत जातो. त्यामुळे शेतकरी दुहेरी अडचणीत सापडतो. त्यात थोडा बहुत निसर्ग सकारात्मक असला तर आलेल्या पिकाला बाजारात भाव मिळत नाही. अशा अनेक समस्यांना शेतक-यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांना उत्पन्न कमी मिळते. त्यात योग्य उत्पन्न न मिळाल्यामुळे ते आर्थिक अडचणीत येतात. अनेक महिलांना अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खूप बिकट होत जाते.

ग्रामीण विकास हा भारताच्या आर्थिक नियोजनामध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. भारताचे खरे दर्शन हे खेड्यांमध्ये होते व ग्राम हा भारताचा आत्मा होय, हे गांधीजींचे विचार आजही खरे आहेत. भारताचा सांस्कृतिक वारसा खेड्याने जपला आहे. आर्थिक नियोजनाच्या पाच दशकांमध्ये आपल्या देशात नागरीकरणाची प्रक्रिया अतिशय गतिमान झाली, तरी सुद्धा भारतीय लोकसंख्येच्या 72% लोक हे खेड्यांमध्ये राहतात. आपल्या देशाच्या कार्यकारी लोकसंख्येच्या 65 प्रतिशत लोक हे उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून असून, हेच क्षेत्र लोकांची अन्न-धान्याची गरज पूर्ण करते. यामुळे शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु, देशाची अन्न-धान्याची गरज पूर्ण करणा-या या क्षेत्रातील लोक मात्र स्वत: दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात.[4] त्यात महिलांचे प्रमाण अधिक दिसून येते. शेतीक्षेत्रातील महिलांचे कमी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

शिक्षण किंवा निरक्षरता असल्यामुळे त्यांचे वेतन किंवा मजुरी ही त्यांना कमीच मिळते. त्यामुळे त्यांचे उत्पन्नही कमीच असते. एकीकडे घर खर्च तर दुसरीकडे मुलांच्या शिक्षणासाठी ही खर्च करावा लागतो. त्यामुळे अधिक काळ श्रम करूनही मिळणारा मोबदला कमी असतो. या महागाईच्या दुनियेत ते उत्पन्न कमी पडते, परिणामी त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची होऊन जाते. त्यामुळे त्यांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

अर्थशास्त्रज्ञ श्री अमर्त्य सेन यांनी असे म्हटले आहे की, महिलांना नेहमीच त्यांचा मोबदला मिळत नाही, असे श्रम करावे लागले आहे. श्रमाच्या या विभागणीमुळे महिला या संघटित होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे साहजिकच त्यांचा आर्थिक विकास झाला नाही. रोजगारांच्या दृष्टीने संघटित व असंघटित क्षेत्रात महिलांना किती संधी दिली गेली आहे यावरून रोजगारांच्या क्षेत्रात महिलांची प्रगती लक्षात येते.[5] आशियामध्ये विशेषत्वाने भारतात कृषी क्षेत्रात महिलांची मोठी शक्ती आहे. ग्रामीण भारतात उपजीविकेसाठी कृषीवर अवलंबून असलेल्या महिलांची टक्केवारी 84% पर्यंत अधिक आहे. महिलांचा सहभाग विचारात घेता 33% लागवड करणा-या आणि 47% प्रमाण कृषी मजूर यांचे आहे. पशुधन, मत्स्यपालन आणि देशातील इतर अन्यं खाद्यान्न् उत्पंन्नातील सहाय्यक स्वंरूपात असलेल्या व्यतिरिक्त 2009 मध्ये पीक लागवडीमध्ये समावेशित टक्केवारी सापेक्ष 94% महिला कृषी मजूर तृणधान्य उत्पादनात समाविष्ट होते.[6] आजही महिला कुटुंबाच्या कल्याणासाठी कमी वेतनावर श्रम करतात. कमी वेतनावर जास्त वेळ श्रम करावे लागते. घरचे काम करून, त्या शेतात काम करतात. मात्र, महिला मजुराला पुरूष मजुराच्या तुलनेत 70 टक्के मजुरी दिली जाते. ग्रामीण भागामध्ये जास्तीत जास्त मजुरी करणा-या महिला आहेत. ती मजुरी ही त्यांच्या हातात पडत नाही. त्यांची मजुरी पतीकडे किंवा कुटुंबप्रमुखांकडे दिली जाते. महिलांना कोणत्याही आर्थिक व्यवहारात सहभागी करून घेतले जात नाही. खूप कमी महिला आर्थिक व्यवहार करताना दिसतात. भारतात असणारी पितृसत्ताक कुटुंबपद्धती स्त्रियांना हीन दर्जा देण्यास कारणीभूत आहे. मात्र, जागतिकीकरणाने भारतातील महिलांना विकासाच्या संधी मिळाल्या असून, सामाजिक सुधारणा होत आहेत.

भारताच्या कृषी क्षेत्राला आजही शेतकऱ्यांच्या गरीब परिस्थितीसह, यांत्रिकीकरणाच्या अभावामुळे तसेच लहान शेतीच्या आकारामुळे कार्यक्षमतेच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. भारतात पारंपरिक शेती अजूनही प्रबळ आहे. कारण बरेच शेतकरी पीक उत्पादनासाठी खत म्हणून आणि जनावरांवर चालणाऱ्या नांगराचा वापर करण्यासाठी पशुधनावर अवलंबून असतात. शेतीचा आकार लहान असल्यामुळे यंत्रांचा वापर करता येत नाही. दिवसेंदिवस शेतीचे विभाजन होत आहे. लहान-लहान तुकड्यांमध्ये शेती केली जात आहे. त्यामुळे तंत्र वापरता येत नाही. विशेष महिलांकडे शेती कमी असते. त्यामुळे त्यांना उत्पन्नही कमी मिळते. जास्त शेती नसल्यामुळे त्यांना मोठ्या यंत्रांचा वापर करता येत नाही. त्यांना उत्पादन पाहिजे तसे घेता येत नसल्यामुळे त्यांची आर्थिक बाजू कमकुवत राहते.

हरितक्रांती आणि उदारीकरणाच्या आगमनाने पुरुष कामगार अधिकाधिक शहरीकेंद्राकडे खेचले गेले. ज्यामुळे शेतमजुरीमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांची संख्या वाढली.[7] परंतु, महिलांना पूर्णवेळ रोजगार मिळत नाही. हंगामी रोजगार असतो बाकी वर्षभर त्या बेरोजगारच असतात. तसेच अनौपचारिक व कमी वेतनावर काम करावे लागते. त्यांना पूर्णवेळ काम मिळत नाही. त्यामुळे महिलींची आर्थिक परिस्थिती आणखी बिकट होत जाते. कृषिक्षेत्रात पूर्णवेळ काम मिळत नाही म्हणून अनेक महिला बेरोजगार राहतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

अनेक देशांची अर्थव्यवस्था विशेषत: भारतासारख्या अविकसित देशाची अर्थव्यवस्था ही शेतीवरच अवलंबून असते. परंतु, शेतीला कायमस्वरूपाचा पाणीपुरवठा नसेल, शेती निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असेल, कर्जपुरवठा न केल्यास, योग्य खते, बी-बियाणे, अवजारे न पुरविल्यास शेती उद्ध्वस्त होते व देशाचा आर्थिक कणाच मोडतो. यासाठी कल्याणकारी राज्यात विविध सिंचनाच्या सोयी निर्माण करणे, मालाच्या वाहतुकीसाठी पक्की सडक बांधणे, अल्पदराने विद्युतपुरवठा करणे, सुधारित बी-बियाणे, जंतूनाशके, रासायनिक खतांचा पुरवठा करणे, अल्प व्याजदराने कर्ज देणे, पीक तारणाची सोय करणे, कृषी विमा काढणे, नुकसान भरपाई देणे या गोष्टी शासनाकडून केल्या जातात. परंतु या सर्व योजना महिलांपर्यंत पोहोचत नाहीत.

1965 नंतर भारतातील शेती उत्पादनात अचानक व अनपेक्षित जो बदल घडून आला व शेतीतील पिकांच्या उत्पादनात भरमसाठ वाढ झाली.[8] हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांना जिवनात अमूलाग्र परिवर्तन घडून आले. पिकाच्या जुन्या जातीऐवजी संकरित व सुधारित जाती आल्या. रासायनिक खते व कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करयण्यात येऊ लागला. वर्षांतून 2-3 पिके घेण्यात येऊ लागली. शेतीमधील उत्पादन वाढले. त्यामुळे शेतक-यांचे उत्पन्न क्रयशक्ती वाढली. खेडी बाजरपेठांशी जोेडण्यात आली. बँका व सहकारी संस्थेचे जाळे विणले गेले. ग्रामीण सावकारांचे उच्चाटन झाले. शेतकऱ्यांच्या जिवनमानात सुधारणा झाली. नैराश्याची जागा आत्मविश्वासाने घेतली. परंतु, या हरितक्रांतीचा  फायदा मात्र अधिकांश मोठ्या शेतकऱ्यांनाच झाला.[9] हरितक्रांतीचा फायदा अल्पभूधारक महिलांना झाला नाही. भरपूर महिलांकडे एक हेक्टरच्यावर शेतजमीन नसते. त्यात पाण्याचीही सोय नसल्यामुळे हरितक्रांतीचा लाभ महिलांना झालेला नाही. खूप कमी महिलांच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते. वर्षांतून दोन-तीन पिके घेत आहेत. मात्र त्याचे प्रमाण अल्प आहे. बऱ्याच महिलांनी फळबागाची शेती केलेली आहे. कृषी क्षेत्रातील महिलांचा सहभाग दर चहाच्या मळ्यात 47%, कापूस लागवडीत 46.84%, तेल बियाणे 45.43% आणि भाजीपाला उत्पादनात 39.13% आहे. या पिकांना श्रमकेंद्रित कामांची आवश्यकता असताना हे काम अत्यंत अकुशल मानले जाते. स्त्रियादेखील सहाय्यक कृषी कार्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात.[10]

सामाजिक व आर्थिक कार्यक्रमांतर्गत लघु उद्योग हस्तकला, हातमाग, दुग्धव्यवसाय, वराहपालन, कुक्कुटपालन किंवा अन्य पशुपालन कार्यक्रमासाठी आर्थिक मदत केली जाते. यातूनही महिलांना रोजगार मिळतो.

ग्रामीण शेतकरी महिला बचतगटातील महिलांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन तसेच शेतकरी महिला विकासाचा उद्देश समोर ठेवून शासनाने योजना सुरू केल्या आहेत. ज्यामुळे महिलांना आर्थिक व तांत्रिक पाठबळ मिळत आहे. राष्ट्रीय प्रशिक्षण राज्य स्तरीय कृषी व्यवस्थापन व विस्तार प्रशिक्षण कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, खाजगी संस्था महिला विकासासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन करत आहेत. महिलांची सध्याची वाटचाल ही निश्चितच प्रगतीकडे जाणारी आहे, असे दिसून येत आहे.

कृषी क्षेत्रात महिलांची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. परंतु, याचे प्रमाण खूप कमी दिसून येते. महिलांचा निर्यातीतील वाटा वाढल्याचे दिसून येत आहे. पूर्वी महिला कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शेती करत होत्या. मात्र, आता निर्यात होईल असे उत्पन्न घेत आहेत. हरितक्रांतीमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. परंतु महिलांचे निर्यातीतील प्रमाण अल्प असल्याचे दिसून येते. महिलांनी शेतीक्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. परंतु, त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मात्र कमी आहे, हे चिंताजनक बाब आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संदर्भ ग्रंथसूची**

1. m.marathikrishijagran.com
2. maxmaharashtra.com
3. mr.m.wikipedia.org
4. उज्ज्वला वैरागडे, प्रा. विद्युलता मुळे, सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, प्रकाशन औरंगाबाद, वर्ष 2012, पृ. क्र.27, 28
5. उपरोक्त उज्ज्वला वैरागडे, प्रा. विद्युलता मुळे, वर्ष 2012, पृ. क्र.356
6. ag.fmc.com
7. mr.m.wikipedia.org
8. प्रा. लक्ष्मण कोतापल्ले, भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य, प्रकाशन औरंगाबाद, वर्ष 2014, पृ. क्र.138
9. उपरोक्त, प्रा. लक्ष्मण कोतापल्ले, वर्ष 2014, पृ. क्र.139
10. mr.m.wikipedia.org


Copyright © | JET Network, All Rights Reserved